


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २९२ वा | बुधवार दि ०४ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# शरद पवार मुख्यमंत्री फडणवीसांवर संतापले, त्यांना माझा उल्लेख करण्याचा विलीनीकरणावरही भूमिका जाहीर...

**वृत्तसंस्था/बारामती**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला असून यावरून राजकीय दावे-प्रतिदावे केले जात आहेत. अजित पवार यांच्याशी आमची सर्व चर्चा झाली होती आणि लवकरच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची अधिकृत घोषणा केली जाणार होती, असं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध नेत्यांकडून सांगितलं जात आहे. मात्र अशी कोणतीही चर्चा अजित पवार यांनी आमच्याशी केली नव्हती, असं राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केलं. या पार्श्वभूमीवर आज बारामती इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाचा समाचार घेतला आहे. तुम्ही विलीनीकरणाबद्दल भाष्य केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात उडी घेतली आणि राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली असती तर अजितदादांनी मला त्याबाबत कल्पना दिली असती. तसंच विलीनिकरणाचा मुद्दा होता तर पवारसाहेब एनडीएसोबत येणार होते का? असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. त्यावर तुमची प्रतिक्रिया काय?३ असा प्रश्न आज बारामती येथील पत्रकार परिषदेदरम्यान शरद पवार यांना विचारण्यात आला. त्यावर बोलताना पवारांनी म्हटलं की, त्यांना माझ्याबाबतचा उल्लेख करण्याचा काय अधिकार आहे, हे समजलं नाही. कारण या विलीनीकरणाच्या चर्चेत ते कुठेच नव्हते. त्यामुळे त्यावर भाष्य करण्याचा त्यांना काय अधिकार आहे, हे मला माहीत नाही,अशा शब्दांत पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना सुनावलं आहे. अजित पवारांच्या अकाली निधनामुळे आम्हा लोकांसमोर जे संकट आहे, त्यातून परस्परांना धीर देणं आणि पुढे कसं जायचं, यावर आमचं लक्ष आहे. राजकीय निर्णयाशी संबंधित आम्ही कोणाशी चर्चा करत नाही, असंही विलीनीकरणाबाबत बोलताना शरद पवारांनी म्हटलं आहे. तसंच सुनेत्रा पवार यांचा शपथविधी झाला याचा आम्हाला आनंद आहे. त्यांना संधी दिली, याचा आम्हाला आनंद असल्याचंही ते म्हणाले दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर दोन दिवसांतच सुनेत्रा



पवार यांचा उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी सोहळा झाल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना सोशल मीडियावर ट्रोल केलं जात असल्याबाबतही शरद पवारांना प्रश्न विचारण्यात आला. मात्र मला त्यावर भाष्य करायचं नाही, असं म्हणत पवार यांनी बोलणं टाळलं.

# राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल प्रफुल्ल पटेलांची मोठी घोषणा; सर्व चर्चा संपवल्या, सुनेत्रा पवारांवरही स्पष्टच बोलले!

**वृत्तसंस्था/बारामती**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, यावरून मागील काही दिवसांपासून राजकीय रणकंदन सुरू आहे. प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची या पदासाठी चर्चा सुरू झाल्यानंतर तर्क-वितर्क लढवले जात होते. मात्र आता पटेल यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. ङ्कराष्ट्रवादी पक्षाच्या अध्यक्षपदाचा निर्णय योग्य रीतनेच होईल, योग्य दिशेनेच होईल, योग्य व्यक्तीचाच होईल आणि माझ्याशिवाय होईल, असं म्हणत आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नसल्याचं प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर केलं आहे. जे लोक कधीही लोकांमध्ये जाऊन निवडणूक लढले नाहीत, अशा लोकांनी माझ्याबद्दल चर्चा करणं योग्य आहे का? १९५२ पासून माझ्या वडिलांना जनतेनं निवडून दिलं आणि मलाही अनेक वर्षे लोकांनी निवडून दिलं आहे. आमच्याबद्दल आणि आमच्या बॅकग्राऊंडबद्दल कोणी अशी चर्चा करत असेल तर त्यांना लाज वाटली पाहिजे, असा हल्लाबोल प्रफुल्ल पटेल यांनी टीकाकारांवर केला आहे. तसंच आमच्याकडून राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाबद्दल कोणतंही वक्तव्य केलं गेलेलं नसताना उगाच हे वादळ निर्माण करणं आणि आमच्या पक्षात संशय निर्माण करणं, ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. आमच्या पक्षाच्या अध्यक्षपदाचा आम्ही योग्य निर्णय घेणार आहोत. मी सोडून इतर कोणाकडे तरी अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाईल. योग्य व्यक्तीची या पदावर निवड केली जाईल. मी राष्ट्रवादीचा कार्याध्यक्ष म्हणून अजितदादांच्या निधनानंतर पुढे काय, नेतृत्व कोणाकडे, या सगळ्या गोष्टी बघण्याची जबाबदारी माझ्यावर आहे आणि मी ती योग्य रीतीने पार पाडत आहे, असा दावा पटेल यांनी केला आहे. राष्ट्रवादीसारख्या रांगड्या पक्षाचा अध्यक्ष कोणीतरी मराठी झाला पाहिजे, कोणी पाटील चालेल, पण पटेल नको, असं म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला होता. त्यावर उत्तर देताना पटेल म्हणाले की, राज ठाकरे किंवा इतर कोणी आमच्या पक्षाचा विधीमंडळ नेता किंवा अध्यक्ष कोण होणार, हे ठरवणार का? ते आमच्या पक्षाचे नेते आहेत का? राज ठाकरे असतील किंवा सकाळचे जे ९ वाजताचे बुलेटिन आहे , ते आम्हाला



आम्ही काय करायचं सांगत आहेत. पण आम्ही उपमुख्यमंत्रिपदाबाबत जसा योग्य निर्णय घेतलाय, तसाच योग्य निर्णय राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाबद्दल घेऊ आणि त्याची प्रक्रिया सुरू आहे, असं ते म्हणाले. दरम्यान, प्रफुल्ल पटेल यांनी आज राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाच्या स्पर्धेत आपण नसल्याचं जाहीर केल्याने सुनेत्रा पवार यांची निवड या पदावर निश्चित मानली जात आहे.

# ...डिजीटल क्रांतीच्या कळा...



भारतातील तरुण पिढी डिजिटल व्यसनांच्या विळख्यात सापडली आहे,फ हा देशाच्या आर्थिक पाहणी अहवालात काढण्यात आलेला निष्कर्ष सर्वस्वी नवा किंवा धक्कादायक मुळीच नाही; मात्र वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाच्या पलीकडे जाऊन या पिढीची उत्पादकता आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे त्याचे परिणाम मात्र चिंता करावी, असेच आहेत. या पाहणी अहवालामध्ये डिजिटल व्यसनाधीनता या विषयावर प्रथमच स्वतंत्र अध्याय सादर करावासा वाटावा, त्यावरून या मुद्द्याचे गांभीर्य लक्षात येते. डिजिटल साधनांचा अतिरेकी वापर आणि त्यातून उद्भवणाऱ्या शारीरिक-मानसिक व्याधी यांवर अनेक अभ्यास आजवर करण्यात आले. मात्र, भविष्यात या व्यसनाधीनतेचे साऱ्या देशावर काय परिणाम होतील आणि धोरणकर्त्यांनी कोणती पावले उचलावीत, याबाबत अहवालात विशेषत: भारतीय संदर्भाने मांडलेला सर्वांगीण दृष्टिकोन नक्कीच अंतर्मुख करणारा आहे. बदलत्या जगात सामोरे येणारे डिजिटल युग, ही एक प्रकारे अपरिहार्यता बनत असतानाच, या साधनांच्या अतिरेकी आणि अविवेकी वापराचे ङ्कसाइड इफेक्टफ किती धोकादायक आहेत, याकडे देशाच्या आर्थिक सल्लागारांनी सप्रमाण लक्ष वेधले आहे आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांबाबतही चर्चा केली आहे. या शतकाच्या सुरुवातीला भारतात डिजिटल क्रांतीच्या पाऊलखुणा उमटू लागल्या. विशेषत: करोना साथीनंतर ङ्कऑनलाइनफ हा अनेक दैनंदिन व्यवहारांमध्ये परवलीचा शब्द झाला. विशेषत: डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये झालेल्या विस्ताराचे जगभरात कौतुकही होते. गेल्या वर्षी डिजिटल अर्थव्यवस्थेचा ङ्कजीडीपीफमध्ये सुमारे १४ टक्क्यांचा वाटा होता. देशातील इंटरनेट जोडण्यांची संख्या ९७ कोटींवर पोहोचली असून, ८५ टक्के कुटुंबांमध्ये किमान एक ङ्कस्मार्टफोनफ आहे. इंटरनेटचा निम्म्याहून अधिक वापर हा व्हिडीओ पाहण्यासाठी, ४३ टक्के नागरिक समाजमाध्यमांवर आहेत. ४० टक्के नागरिक ई-मेलचा वापर करतात, तर २६ टक्के नागरिक डिजिटल पेमेंट करतात. त्याबरोबरच ३५ कोटी नागरिक समाजमाध्यमांवर असून, ४० कोटी ङ्कओव्हर द टॉपफ्चे (ओटीटी) वापरकर्ते आहेत. वाढत्या ङ्कस्क्रीन टाइमममुळे निद्रानाश, एकाग्रता-आत्मविश्वासाचा, अकारण चिंता-नैराश्य आणि ताणातून होणाऱ्या आत्महत्या; तसेच बैठ्या जीवनशैलीमुळे जडणाऱ्या शारीरिक व्याधी यांना अनेक जण तोंड देत आहेत. मात्र, या सर्वांचा विद्यार्थी व तरुण पिढीच्या कार्यक्षमतेवर होणारा विपरीत परिणाम साऱ्या देशासाठी घातक आहे. यातून आरोग्यसेवेवर होणारा खर्च आणि ऑनलाइन फसवणूक चिंताजनक आहे. तरुण लोकसंख्येचा लाभ (डेमोग्राफिक डिव्हिडंड) मिळवण्याच्या काळातच देशाची सर्वांत मोठी संपत्ती असलेल्या तरुण मनुष्यबळाची उत्पादकता घटणे खचितच परवडणारे नाही. याबाबत सायबर सुरक्षा शिक्षण, विद्यार्थी-पालक प्रशिक्षण, स्क्रीन टाइम व्यवस्थापन असे काही उपाय आर्थिक सल्लागारांनी सुचवले आहेत. जवळपास प्रत्येक देशातल्या पालकांना हीच चिंता सतावते आहे. त्यामुळेच ऑस्ट्रेलियासारख्या देशांनी १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना समाजमाध्यमांच्या वापरावर घातलेल्या बंदीचे काय परिणाम होतात, याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. आपल्याकडेही आंध्र प्रदेश-गोव्यात लहान मुलांना अशी बंदी घालण्यासंदर्भात मंत्रिगट अभ्यास करीत आहेत; तसेच डिजिटल वापराची अपरिहार्यता असलेल्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांनाही काहीशी मोकळीक मिळावी, या उद्देशाने ङ्कडिजिटल डिटॉक्सफ्चे खासगी विधेयक संसदेत सादर झाले आहे. याबाबत सध्याचे कायदे, राज्य सरकारांना असलेले अधिकार आणि परिणामकारक अंमलबजावणीतील मर्यादा, अशी व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. ङ्कमुक्तीचे महाद्वारफ म्हणून गौरवली गेलेली ही डिजिटल क्रांती त्याच्या विचारशून्य वापरामुळे पाश ठरू नये, ही अपेक्षा चुकीची नाही. या माध्यमांचा विस्तार, हे आपल्या होकार किंवा नकाराच्या पलीकडे जाऊन एक वास्तव ठरले आहे; त्यामुळेच शिक्षण किंवा रोजगारांचीही अपरिहार्यता बनलेल्या या ऑनलाइन जगापासून नव्या पिढीला दूर ठेवणे शक्यही नाही. मात्र, त्याचे दुष्परिणाम टाळायचे असतील, तर रडणाऱ्या लहान बाळाला शांत करण्यासाठी त्याच्या हाती मोबाइल फोन देण्यापासून पालकांनाही आपल्या सवयी आमूलाग्र बदलाव्या लागतील. अंधपणे या माध्यमांच्या आहारी जाणे विघातक ठरेल, यात दुमत नसावे. त्यामुळेच, सरकार यावर उपाय करीलच; तोवर या स्मार्ट साधनांचा स्मार्ट वापर, हाच एकमेव पर्याय सध्या तरी दिसतो.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुधार समितीत सत्ताधाऱ्यांची सद्दी, मुंबई पालिकेत महायुतीसाठी बहुमताचा मार्ग मोकळा



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेतील महत्त्वाच्या स्थायी आणि सुधार समितीत सत्ताधारी आणि विरोधक अशा दोघांच्याही नगरसेवकांचे सारखेच संख्याबळ होत होते. मात्र, आता सत्ताधाऱ्यांनी यावर नामी तोडगा काढला असून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा एक वेगळा सहयोगी गट तयार करण्याची रणनीती आखण्यात आली आहे. त्यामुळे आता २६ नगरसेवकांच्या या दोन्ही समित्यांमध्ये १४-१२ असे बहूमत सत्ताधारी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीला राखता येणार आहे. तसेच नव्या समीकरणामुळे एमआयएमच्या वाट्याला येणारे एकमेव स्वीकृत नगरसेवक पदही शिवसेना- राष्ट्रवादी सहयोगी गटाकडे जाणार असल्याचे सम जते.महापालिकेत शिवसेना (उबाठा) पक्ष आणि काँग्रेस यांच्या नगरसेवकांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे स्थायी आणि सुधार या महत्त्वाच्या समित्यांमध्ये भाजप-शिवसेना तसेच शिवसेना (उबाठा) पक्ष, काँग्रेस आणि एमआयएम यांची समसमान सदस्यसंख्या होत होती. त्यानुसार २६-२६ सदस्यांच्या स्थायी आणि सुधार समितीमध्ये भाजपला १० आणि शिवसेनेला तीन सदस्य मिळणार होते. शिवसेना (उबाठा) पक्षाला ८, काँग्रेसला ३, मनसे १ आणि एमआयएम १ सदस्य मिळणार होती. दोन्ही समित्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांची सदस्यसंख्या समान असल्याने कोणताही प्रस्ताव मंजूर करणे सत्ताधाऱ्यांसाठी अवघड झाले होते. यावर तोडगा काढण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी आपली गटनोंदणी लांबवली होती. सुरुवातीला भाजप आणि शिवसेना एकत्र गटनोंदणी करतील अशी चर्चा होती, पण आता त्यांनी स्वतंत्रपणे नोंदणी केली आहे. मात्र, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस मिळून एक गट तयार करणार आहेत. या गटाची नोंदणी मंगळवारी पूर्ण होईल. या दोन्ही पक्षांची सदस्यसंख्या ३२ होईल, ज्यामुळे महापालिकेतील स्थायी आणि सुधार समित्यांमधील विरोधकांचे गणित बिघडणार आहे.नव्या संख्याबळानुसार, भाजपचे स्थायी आणि सुधार समितीत १० सदस्य असतील. तर, शिवसेना (उबाठा) पक्षाचे ७ सदस्य असतील. याआधी शिवसेनेचे फक्त ३ सदस्य जाणार होते. पण राष्ट्रवादी काँग्रेस सोबत आल्याने आता दोघांचे मिळून दोन्ही समित्यांवर ४ सदस्य असतील. यामुळे सत्ताधाऱ्यांचे १४-१२ असे नवे बहुमत तयार होईल. त्यामुळे महापालिकेत स्थायी आणि सुधार समित्यांमध्ये बहुम ताने प्रस्ताव मंजूर करण्याचा सत्ताधाऱ्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.महापौरपदाची निवडणूक ११ फेब्रुवारीला घेण्याचा महापालिकेचा विचार आहे.

## महापौर निवडीसाठी भाजपमध्ये खलबतं, 'ही' तीन नावं चर्चेत



**पुणे :** आता उत्सुकता लागलेली आहे ती महापौर निवडीची. महापौर निवडीवरून आता राजकीय हालचाली वाढल्या आहेत. पुणे महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर निवडीसाठीही प्रचंड वेगवान घडामोडी घडत असून आता भाजपच्या गोटात मोठी खलबतं सुरु झाली आहेत. आज रात्री उशीरा पुण्यात भाजपच्या कोअर कमिटीची अत्यंत महत्वाची बैठक पार पडली आहे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीमध्ये पुण्याच्या महापौरपदासाठी संभाव्य नावे निश्चित करण्यात आली आणि त्यांच्यावर चर्चा पार पडली आहे. असं असलं तरी महापौर कोण होणार हा सस्पेन्स अजिबात संपलेला नाही. याबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री फडणवीस घेणार असल्याचे समोर आले आहे. उद्या महापौर, उपमहापौर पदासाठी भाजपकडून उमेदवारांचा अर्ज दाखल केला जाणार आहे.दरम्यान, या भाजपच्या या बैठकीला कोअर कमिटीच्या बैठकीला प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्यासह मंत्री चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, सभागृह नेते गणेश बिडकर, शहराध्यक्ष धीरज घाटे यांचेसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पुणे महापौर पदासाठी मंजुषा नागपुरे, वर्षा तापकिर, मानसी देशपांडे या तीन महिला नगरसेवकांमध्ये पदासाठी जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत आहे. पण असं असलं तरीही ऐनवेळी चौथाच डार्क हॉर्स महिला उमेदवार वरिष्ठांच्या आशिर्वादाने बाजी मारणार का याकडेही पुणे भाजपच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे. नगरसेवकांनी आपआपल्या परिने मोर्चेबांधणी केली असून कोणाचे नशीब उजळणार हे पाहणेही तितकेच महत्वाचे ठरणार आहे. भाजपमध्ये अनेकदा अनपेक्षित निर्णय घेतले गेलेले आहेत.

## अपघातावेळी अजित दादांकडे 'ती' फाईल होती

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचा मुद्दा संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनाबद्दल त्यांनी संशय व्यक्त केला. इतक्या दमदार नेत्याचा अकाली मृत्यू होतो. ही बाब अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी आहे, असं संजय राऊत म्हणाले. मला अजित पवारांची आठवण येते. अतिशय तडफदार नेते होते. गेल्या ३ वर्षांपासून ते भाजप सोबत होते. भाजपचे साथीदार होते, असं खासदार संजय राऊत राज्यसभेतील भाषणात म्हणाले. 'अजित पवार यांच्यावर सिंचन घोटाळा प्रकरणात ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले. हे आरोप भाजपच्याच नेत्यांनी केले होते. मग अजित पवार भाजप सोबत आले आणि पवित्र झाले,' अशा शब्दांत संजय राऊतांनी भाजपला संसदेत लक्ष्य केलं.१५ जानेवारीला अजित पवार यांनी एक विधान केलं होतं. त्यांनी भाजपला प्रत्युत्तर दिलं होतं. भाजपनं अजित पवारांवर सिंचन घोटाळ्याचे आरोप केले.

## मनसे मुंबईत भाजपला पाठिंबा देण्याची चर्चा, ठाकरेंनी चित्र स्पष्ट केलं



**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता महापौर निवडीकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे. मुंबई महापालिकेत भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या युतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. मात्र तरीही या दोन पक्षांपैकी कोणाचा महापौर बसणार, याबाबतची उत्सुकता अजूनही कायम आहे. अशा स्थितीत महायुतीतील हे दोन्ही पक्ष इतर पक्षांच्या नगरसेवकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. राष्ट्रवादीचे नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा देणार असल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर आता भाजपनेही हालचाली सुरू केल्या आहेत. भाजपकडून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना पाठिंब्यासाठी संपर्क साधला जात असल्याचं बोललं जात होतं. तसंच मनसेही महापौरपदासाठी भाजपला पाठिंबा देण्यास अनुकूल असल्याची चर्चा होती. मात्र स्वत: मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हा दावा खोडून काढत भाजपला पाठिंबा देणार नसल्याचं जाहीर केलं आहे.मुंबई महापालिका निवडणूक निकालानंतर आज मुंबईतील एमआयजी क्लब इथं मनसेची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राज ठाकरे यांनी मनसे पदाधिकाऱ्यांसोबत मुंबईतील निकालाबाबत चर्चा केली. बैठक संपल्यानंतर बाहेर पडताना पत्रकारांनी राज ठाकरे यांना महापौरपदाच्या पाठिंब्याबाबत प्रश्न विचारला. महापौरपदासाठी तुम्ही भाजपला पाठिंबा देणार असल्याची चर्चा सुरू आहे, असं पत्रकारांनी म्हणताच 'आम्ही भाजपला पाठिंबा देणार नाही, हे मी स्वत: सांगतोय,' असं म्हणत राज ठाकरे यांनी राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचा मुंबईत महापौरपदासाठी शिवसेनेला पाठिंबा देण्याची भूमिका राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार नवाब मलिक यांनी घेतल्याचे समजते.

# कोल्हापूर महापालिकेच्या महापौर पदासाठी भाजपकडून नाव निश्चित, उपमहापौर पद शिवसेनेऐवजी छोट्या पक्षाला..



**कोल्हापूर :** कोल्हापूरात महापालिकेत काँग्रेससोबत झालेल्या चुरशीच्या लढतीत महायुतीने यश मिळवले. पण निकाल जाहीर होऊन पंधरा दिवस लोटल्यानंतरही महापौर-उपमहापौर निवडी लांबल्या होत्या. मात्र, आज राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजपच्या रूपाराणी संग्रामसिंह निकम यांना महापौर पदासाठी उमेदवार म्हणून जाहीर केले. तर उपमहापौर पदी जनसुराज्य शक्ती पक्षाकडून निवडून आलेले अक्षय जरग यांची वर्णी लागणार आहे. निकम आणि जरग यांनी आजच उमेदवारी अर्ज दाखल केला असून, ६ फेब्रुवारीला निवडणूक प्रक्रिया पार पडेल. कोल्हापूर महानगरपालिकेत भाजपचा हा पहिलाच महापौर होणार आहे.१५ जानेवारीला पार पडलेल्या कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीत ८१ नगरसेवकांसाठी २० प्रभागांतून चुरशीचा लढा रंगला. १६ जानेवारीला जाहीर झालेल्या निकालात काँग्रेसने एकहाती ३४ जागा मिळवत सर्वांत मोठा पक्ष ठरला. भाजपने २६ जागा जिंकल्या, तर शिवसेनेने १५ जागा पटकावल्या. राष्ट्रवादीला केवळ ४ जागा मिळाल्या, तर जनसुराज्य शक्ती पक्ष आणि ठाकरेंच्या शिवसेनेला अनुक्रमे १-१ जागा लाभल्या.कोल्हापूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ताराराणी आघाडी, काँग्रेस-राष्ट्रवादी आणि जनसुराज्य पक्षाचे वर्चस्व राहिले. भाजपला नेहमीच बोटावर मोजता येतील जागा मिळत होत्या. यंदा मात्र ३६ जागांवर लढलेल्या भाजपने २६ जागा जिंकत दुहेरी आकडा गाठला. महायुतीचे एकूण ४६ नगरसेवक हे संख्याबळ महापौर निवडीसाठी निर्णायक ठरेल.महायुतीच्या (भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी-जनसुराज्य) एकूण ४६ नगरसेवक असल्याने महापौर पद निश्चितच त्यांच्याकडेच जाईल, असे संकेत मिळाले. मात्र, शिवसेनेने प्रथम दावा केला होता. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंत्री पाटील यांच्याशी चर्चा करून महापौर पदासाठी नावे मागवली. भाजपचे मुरलीधर जाधव, विशाल शिराळे, विजयसिंह खाडे-पाटील, रूपाराणी निकम, वैभव कुंभार आणि विशाल देसाई ही नावे प्रदेश कार्यालयाकडे पाठवली गेली. यापैकी मुख्यमंत्र्यांनी रूपाराणी निकम यांच्यावर शिक्कामोर्तब केले, अशी माहिती चंद्रकांतदादा पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.दुसरीकडे, कोल्हापुरात सर्वांत मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसने ठाकरेंच्या शिवसेनेला सोबत घेऊन महापौर पदासाठी सचिन मारुती शेंडे आणि उपमहापौरसाठी दुर्वास कदम यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांनीही सोमवारी महापालिकेत उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान महापौर आणि उपमहापौर या दोन्ही पदांसाठी ६ फेब्रुवारीला निवड होईल. या निवडीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# नऊ वर्षांच्या अफेअरनंतर लग्न, पण दोनच महिन्यात नवविवाहितेने नवऱ्याचा जीव घेतला

**लखनौ :** नऊ वर्षांच्या प्रेमसंबंधानंतर प्रियकर-प्रेयसीचं लग्न झालं, मात्र नवविवाहित तरुणीने विवाहानंतर अवघ्या दोन महिन्यात आपल्या पतीची हत्या केली. तरुणीच्या माहेरच्या मंडळींनी त्याला पकडून ठेवलं असताना तिने पतीचा गळा दाबून खून केल्याचा आरोप आहे. उत्तर प्रदेशातील बरेलीमध्ये अंगाचा थरकाप उडवणारी ही घटना जानेवारी महिन्यात घडली. या प्रकरणी पत्नीसह तिचे आई-वडील आणि भावाला अटक करण्यात आली आहे.ज्योती आणि जितेंद्र कुमार यादव यांनी गेल्या वर्षी २५ नोव्हेंबर रोजी लग्न केले होते. खरं तर त्यांचे प्रेम संबंध कॉलेजच्या दिवसांपासून, म्हणजे नऊ वर्षांपासून सुरु होते. त्यानंतर दोन्ही कुटुंबांच्या संमतीने हिंदू पद्धतीने लग्न पार पडले होते.लग्नाच्या काही आठवड्यांतच पती-पत्नीमध्ये वाद सुरु झाले. हे वाद प्रामुख्याने पैशांवरुन होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जितेंद्रने ज्योतीच्या बँक खात्यातून २०००० रुपये काढले आणि ते ऑनलाइन जुगारात गमावले. या नुकसानामुळे त्यांच्यात वारंवार भांडणे होऊ लागली.२६ जानेवारी रोजी ज्योतीने जितेंद्रला त्या पैशांबद्दल विचारले असता वाद वाढला आणि त्याचे रुपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी ज्योतीने आपल्या आई-वडिलांना आणि भावाला बोलावून घेतले. हे सर्वजण नवविवाहित जोडपं राहत असलेल्या भाड्याच्या घरी आले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ज्योतीचे वडील कालीचरण, आई चमेली आणि भाऊ दीपक हे घरी पोहोचले. त्यानंतर झालेल्या झटापटीत, ज्योतीच्या आई-वडिलांनी आणि भावाने जितेंद्रला पकडून ठेवले, त्याचे हात-पाय धरले. याचवेळी ज्योतीने जितेंद्रचा गळा दाबून त्याला ठार



केले.जितेंद्रने प्रतिसाद देणे थांबवल्यानंतर, कुटुंबाने हत्येच्या खुणा मिटवण्याचा प्रयत्न केला. त्याचा मृतदेह एका मफलरने बांधून खिडकीच्या ग्रीलला लटकवण्यात आला, जेणेकरून हे आत्महत्या असल्याचे भासवता येईल. त्यानंतर शेजाऱ्यांना माहिती देण्यात आली की, जावयाने आत्महत्या केली आहे.पोलिसांनी घटनास्थळी पोहोचल्यावर सुरुवातीला हे आत्महत्येचे प्रकरण मानले. जितेंद्रचा मृतदेह भाड्याच्या घरात लटकलेल्या अवस्थेत आढळला होता, मात्र त्यावेळी आत्महत्येला दुजोरा देणारे कोणतेही तात्कालिक पुरावे नव्हते.

मात्र, जितेंद्रच्या भावाने, अजय कुमार याने तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी ज्योती आणि इतर तिघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आणि शवविच्छेदनाचा आदेश दिला. शवविच्छेदनातून मृत्यूचे कारण गळा दाबणे असल्याचे निष्पन्न झाले, फाशी घेतल्याने नव्हे. यामुळे आत्महत्येची शक्यता फेटाळण्यात आली. या निष्कर्षानंतर पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या आरोपांना खुनात बदलले आणि तपास तीव्र केला. ज्योतीच्या भावाला दीपक यालाही या प्रकरणात आरोपी बनवण्यात आले आहे. पोलीस त्याला पकडण्यासाठी प्रयत्न करत आहेत. चौकशीदरम्यान, ज्योतीने गुन्ह्याची कबुली दिली आणि पतीच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या घटनांचा तपशील पोलिसांना सांगितला. तिने सांगितले की, ती आणि जितेंद्र कॉलेजपासून एकमेकांना ओळखत होते. जितेंद्र बरेली येथील इंडियन व्हेटर्नरी

## पुण्यात विवाहितेनं दोन चिमुकल्यांसह आयुष्य संपवलं

**नाशिक :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पाबळ परिसरात एक काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेनं खळबळ उडाली आहे. पतीकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला आणि मानसिक त्रासाला वैतागून एका ३० वर्षीय विवाहितेने आपल्या दोन निष्पाप मुलांसह विहिरीत उडी घेऊन जीवनयात्रा संपवली. मृतांमध्ये सहा वर्षांचा मुलगा आणि अवघ्या चार महिन्यांच्या तान्ह्या मुलीचा समावेश आहे. या गंभीर प्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत पतीला गजाआड केलं आहे. अहिला उर्फ भाग्यश्री राजू जाधव (वय ३०, आई), सार्थक राजू जाधव (वय ६, मुलगा) आणि गौरी राजू जाधव (वय ४ महिने, मुलगी) अशी मृतांची नावं असून राजू पांडुरंग जाधव (वय ३२) अटक केलेल्या पतीचं नाव आहे.मुळचे बुलढाणा जिल्ह्यातील असलेले हे जाधव कुटुंब पोटापाण्यासाठी पाबळ येथील एका वीटभट्टीवर कामाला होते. मात्र, पती राजू आणि पत्नी भाग्यश्री यांच्यात सातत्याने खटके उडत होते. काल



रविवारी सकाळीही त्यांच्यात कडाक्याचं भांडण झालं. या रोजच्या कटकटीने मनातून खचलेल्या भाग्यश्रीने रागाच्याभरात दोन्ही मुलांना आणि सोबत सायकल घेऊन घर सोडले. दुपार उलटून गेली तरी पत्नी आणि मुले घरी न परतल्याने पती राजूने त्यांची शोधाशोध सुरू केली. घरापासून काही अंतरावर असलेल्या परमेश्वर पिंगळे यांच्या विहिरीच्या काठावर त्याला मुलांची सायकल आणि चपला दिसल्या. यानंतर स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीत पाहिले असता, तिघांचेही मृतदेह पाण्यात आढळून आले.या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आले.

## शिक्षण ७वी पास, स्कॅम मात्र ३ कोटींचा

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण ७वी पास, काम भिशी चालवणे आणि घोटाळा ३ कोटींचा हा कारनामा आहे छत्रपती संभाजीनगर शहरातील एक महिला व तिच्या मुलाचा. पण स्कॅम मात्र कोटींचा केला. दोन्ही मायलेकांनी शहरातील १६ हून अधिक सधन नागरिकांना तब्बल २ कोटी ९९ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, या हायप्रोफाईल फसवणुकीची सध्या शहरात चांगलीच चर्चा आहे.नंदाबाई रमेश अधुडे (वय ४५) आणि मुलगा सौरभ रमेश अधुडे (वय २२, दोघे रा. व्यंकटेश पार्क, बीड बायपास) असं आरोपींचं नाव आहे. तर जयश्री गजानन गिरी (रा. मुकुंदवाडी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. याप्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, मुळची जालना जिल्ह्यातील असलेली नंदाबाई आधुडे या महिलेनं २०१४ पासून शहरात भिशी चालवण्यास सुरुवात केली होती. सुरुवातीला छोट्या रकमा वेळेवर परत करून तिने लोकांचा विश्वास संपादन केला. मात्र, हा विश्वास म्हणजे एका मोठ्या आर्थिक सापळ्याची तयारी होती.

## दगडाने ठेचून तरुणाची हत्या

**बीड :** जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, आज सोमवारी पहाटेच्या सुमारास शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा परिसरात एका ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव गुड्डू तांबोळी (वय अंदाजे ३० वर्षे, रा. रायमोहा, ता. शिरूर कासार) असे आहे. ही घटना शिरूर कासार आणि पाटोदा या दोन पोलीस ठाण्यांच्या सीमेवर असलेल्या रायमोहा गावातील डोंगर देवी शिवारात घडली. प्राथमिक अंदाजानुसार, आज सोमवारी पहाटे ३ ते ४ वाजेच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी गुड्डू तांबोळी यांच्यावर हल्ला केला. अत्यंत क्रूरपणे त्यांच्या डोक्यात मोठा दगड घालून त्यांची हत्या करण्यात आली.सकाळी परिसरातून जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास हा रक्ताने माखलेला मृतदेह आला. घटनेचे




गांभीर्य ओळखून स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना पाचारण केले. माहिती मिळताच शिरूर कासार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा सुरू केला.घटनेची भीषणता पाहता तपासाला गती देण्यासाठी फॉरेन्सिक लॅबच्या टीमलाही पाचारण करण्यात आले आहे. या पथकाने घटनास्थळावरून रक्ताचे नमुने आणि इतर पुरावे गोळा केले आहेत.बीड जिल्ह्यामध्ये मागील काही काळापासून हत्येच्या आणि गंभीर हल्ल्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. रायमोहा हे गाव दोन पोलीस ठाण्यांच्या हद्दीवर असल्याने गुन्हेगारांना मोकळे रान मिळत आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. गुड्डू तांबोळी यांची हत्या नेमक्या कोणत्या कारणातून झाली, जुना वाद होता की अन्य काही कारण, याचा तपास आता पोलीस करत आहेत. पोलिसांचा धाक उरला नसल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करून कडक कारवाई करावी,' अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# मुंबईकर LLB विद्यार्थिनीने लोणावळ्यात आयुष्य संपवलं..!

**पिंपरी-चिंचवड :** मुंबईत एलएलबीचे शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय तरुणीने लोणावळ्यातील टायगर पॉईंट येथून अंदाजे ४०० फूट खोल दरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. श्रेया नरेंद्र पटी असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. कौटुंबिक वादातून तिने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. तब्बल ३६ तासांच्या शोधानंतर लोणावळा शिवदुर्ग रेस्क्यू टीमने अथक प्रयत्न करत खोल दरीतून मृतदेह बाहेर काढला. ड्रोनच्या सहाय्याने शोधमोहीम राबवण्यात आली होती.मुंबईत वास्तव्यास असलेली श्रेया ३१ जानेवारी रोजी 'ट्रेकिंगला जात आहे' असे सांगून घरातून बाहेर पडली होती. सकाळी ११ वाजताच्या सुमारास ती लोणावळ्यात पोहोचली. सुरुवातीला ती ड्युक्स नोज येथे गेली. काही वेळानंतर ती खाली उतरली आणि रिक्षाने टायगर पॉईंट येथे गेली. टायगर पॉईंट येथील एका स्टॉलच्या पाठीमागे तिने आपली बॅग ठेवली होती.

टायगर पॉईंट परिसरात कठड्याजवळ असलेल्या तुटलेल्या तारेच्या कुंपणातून तिने थेट ४०० फूट खोल दरीत उडी घेतल्याची माहिती लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दिली आहे. सायंकाळपर्यंत श्रेया घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र तिचा मोबाईल बंद होता.दरम्यान, काही वेळाने स्टॉलच्या पाठीमागे ठेवलेली बॅग दुकानदाराच्या लक्षात आली. बॅगेतील



ओळखपत्रावर असलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन करुन त्याने माहिती दिली. त्यानंतर श्रेया बेपत्ता असल्याचे कुटुंबीयांच्या लक्षात आले. कुटुंबीय रात्री उशिरापर्यंत लोणावळ्यात दाखल झाले. श्रेया एकटीच आली होती का, तिच्यासोबत कोणी मित्र-मैत्रीण होते का, याची चौकशी करण्यात आली; मात्र ती एकटीच आल्याचे निष्पन्न झाले.बॅगेतील कपड्यांच्या आधारे डॉग स्कॉडने ज्या ठिकाणाहून तिने उडी घेतली त्या ठिकाणापर्यंत पोलिसांना नेले. टायगर पॉईंट परिसर अत्यंत खोल व दुर्गम असल्याने शोधकार्य आव्हानात्मक होते. दुसऱ्या दिवशी ड्रोनच्या सहाय्याने शोध मोहीम राबवण्यात आली. लोणावळा शिवदुर्ग रेस्क्यू टीमही शोधात सहभागी झाली होती. अखेर १ फेब्रुवारी रोजी ३६ तासांहून अधिक काळ चाललेल्या शोधमोहीमेनंतर श्रेयाचा मृतदेह खोल दरीत आढळून आला. शिवदुर्ग रेस्क्यू टीमचे अनिल सुतार हे मृतदेह पॅकिंगचे साहित्य घेऊन सुमारे ४०० फूट खोल दरीत उतरले. वॉकी-टॉकीच्या संपर्कात राहून पाच ते सहा तासांच्या अथक प्रयत्नांनंतर मृतदेह वर काढण्यात आला. श्रेया ही मुंबईतील नामांकित महाविद्यालयात एलएलबीचे शिक्षण घेत होती.

# आम्ही वर्ल्ड कप खेळू पण भारतासोबत नाही, पाकड्यांनी बहिष्कार टाकण्याधी पडद्याआडचा घटनाक्रम

**मुंबई/वृत्तसंस्था :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) आगामी टी-२० विश्वचषकातून बांगलादेशच्या बाहेर पडण्याला पाठिंबा दर्शवला आहे. यामुळे, १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे भारतासोबत होणारा गट फेरीचा सामना पाकिस्तान खेळणार नाही. हा निर्णय पीसीबीने आयसीसी आणि बीसीसीआयसोबत तटस्थ भूमीवर सामने खेळण्याच्या करारावर असताना घेतला आहे. मात्र, पाकिस्तान सरकारने राष्ट्रीय संघाला स्पर्धेत भाग घेण्यास हिरवा कंदील दाखवला आहे.पाकिस्तानचा पहिला सामना नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. पाकिस्तान सरकारच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, 'पाकिस्तान सरकारने पाकिस्तान क्रिकेट संघाला टी-२० विश्वचषकात भाग घेण्यास मान्यता दिली आहे. मात्र पाकिस्तान संघ १५ फ ेब्रुवारी रोजी भारतासोबत नियोजित असलेला सामना खेळणार नाही.' या निर्णयामागे अनेक कारणे आहेत. ३ जानेवारी रोजी, बिघडलेल्या भारत-बांगलादेश संबंधांमुळे बीसीसीआयने कोलकाता नाइट रायडर्सला (केकेआर) आयपीएल मिनी-लिलावात घेतलेल्या मुस्तफिजुर रहमानला सोडण्यास सांगितले.६ जानेवारी



रोजी, बांगलादेशने देशात आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घालण्याचे आदेश दिले. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) असेही म्हटले की, जर एका खेळाडूला 'सुरक्षा धोका' मानले गेले, तर संपूर्ण संघाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो.१२ जानेवारी रोजी, बीसीसीआयने आयसीसीला बांगलादेशचे टी-२० विश्वचषकातील सामने भारतातून श्रीलंकेत स्थलांतरित करण्याची विनंती केली. बीसीसीआयने २०२३ च्या आशिया चषकाप्रमाणेच 'हायब्रिड मॉडेल' सुचवले.२१ जानेवारी रोजी, आयसीसी बोर्डाने बांगलादेशचे सामने स्थलांतरित करण्याच्या विरोधात मतदान केले. १४-२ च्या निर्णयात केवळ पाकिस्तानने बांगलादेशला पाठिंबा दिला. आयसीसीने स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकनात भारतात खेळाडूंना कोणताही 'विश्वसनीय धोका' आढळला नाही असे म्हटले.२२ जानेवारी रोजी, बांगलादेश आपल्या निर्णयावर ठाम राहिले आणि टी-२० विश्वचषकासाठी भारतात खेळण्यास नकार दिला. २४ जानेवारी रोजी, बांगलादेशने टी-२० विश्वचषकातून माघार घेतल्याने, आयसीसीने त्यांना ग्रुप सी मध्ये स्कॉटलंडने बदलले.२४ जानेवारी रोजी, बांगलादेशला टी-२० विश्वचषकातून वगळल्यानंतर, पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नावी म्हणाले की त्यांच्या सहभागावर अंतिम निर्णय पाकिस्तान सरकारच्या संवादानंतर घेतला जाईल. ते म्हणाले, 'आमची भूमि का ििवश्वचषक सहभागावरें पाकिस्तान सरकार जे निर्दे श देईल ते असेल.'

२६ जानेवारी रोजी, नावी यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेऊन चर्चा केली. नावी यांनी ट्विट केले, 'पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासोबत एक फलदायी बैठक झाली. आयसीसीच्या विषयावर त्यांना माहिती दिली, आणि त्यांनी सर्व पर्याय विचारात घेऊन तोडगा काढण्याचे निर्देश दिले. सहभागावर अंतिम निर्णय एकतर शुक्रवारी किंवा पुढील सोमवारी घेतला जाईल, यावर एकमत झाले.'१ फेब्रुवारी रोजी, मोहसिन नावी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी लाहोरमध्ये पुन्हा भेट घेतली. सरकारने राष्ट्रीय संघाला टी-२० विश्वचषकात भाग घेण्यास परवानगी दिली, परंतु १५ फेब्रुवारी रोजी भारतासोबत खेळण्यास मनाई केली. या सर्व घडामोडींमुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या भूमिकेत बदल केला आणि बांगलादेशच्या निर्णयाला पाठिंबा देत भारतासोबतचा सामना न खेळण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) नियमावली आणि करारांच्या विरोधात जाणारा असला तरी, पाकिस्तान सरकारने यावर अंतिम निर्णय घेतला.

# हरियाणा थंडर्सकडे पीडब्ल्यूएलचे विजेतेपद

**नोएडा/वृत्तसंस्था :** रविवारी रात्री नोएडा इनडोअर स्टेडियमवर दिल्ली दंगल वॉरियर्सविरुद्ध झालेल्या अत्यंत रोमांचक आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात हरियाणा थंडर्सने प्रो रेसलिंग लीगचे (पीडब्ल्यूएल २०२६) विजेतेपद पटकावले. आठ सामन्यानंतर गुणसंख्या ४-४ अशी बरोबरीत असताना, सर्व काही महिलांच्या ६२ किलो वजनी गटातील अंतिम लढतीवर अवलंबून होते. पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या इरिना कोलियाडेन्कोने दबावाखाली उत्कृष्ट कामगिरी केली. तिच्या प्रभावी तांत्रिक श्रेष्ठत्वामुळे हरियाणा थंडर्सने ५-४ असा नाट्यमय विजय मिळवला आणि पीडब्ल्यूएलचे विजेतेपद पटकावले. इतिहासातील अतिशय चुरशीच्या अंतिम सामन्यांपैकी एकाची सांगता झाली. हरियाणा थंडर्सला पीडब्ल्यूएलच्या ट्रॉफीसह १.५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले तर उपविजेत्या दिल्ली दंगल वॉरियर्सला ७५ लाख रुपये मिळाले. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये, दिल्ली दंगल वॉरियर्सच्या तुरान बायरामोव्हला ५७ किलो पुरुषांच्या गटात ७ पैकी ७ सामने जिंकल्याबद्दल आणि पीडब्ल्यूएलमध्ये एकूण ५९ गुण मिळवल्याबद्दल २.५ लाख रुपयांचा 'प्लेअर ऑफ द टूर्नाम ेंट' पुरस्कार मिळाला, तर पंजाब रॉयल्सचा चंद्रमोहन स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू ठरला. नेहा सांगवानला (हरियाणा थंडर्स) अंतिम लढत शेवटच्या सामन्यापर्यंत जिवंत ठेवल्याबद्दल 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला, तर रौनकला (दिल्ली दंगल वॉरियर्स) पुरुषांच्या १२५ किलो * गटातील प्रभावी कामगिरीसाठी फायटर ऑफ द मॅच' पुरस्कार



मिळाला. ५७ किलो पुरुषांच्या गटातील दमदार कामगिरीसाठी अक्षय ढेरेला (हरियाणा थंडर्स) 'इम्पॅक्ट प्लेयर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला. चॅम्पियनशिपच्या लढतीची सुरुवात दिल्लीने केली. ७४ किलो पुरुषांच्या गटात अपराजित तुरान बायरामोव्हने पहिला गुण मिळवला. त्याने सुरुवातीलाच आघाडी घेत साम न्यावर नियंत्रण मिळवले आणि ८-१ असा विजय मिळवला. हरियाणाने ७६ किलो महिलांच्या गटात तात्काळ प्रत्युत्तर दिले, जिथे यू-२० विश्वविजेत्या काजल धोचकने युरोपियन चॅम्पियन अनास्तासिया अल्पीयेवाचा ३-१ असा पराभव करून लढत बरोबरीत आणला. ६५ किलो वजनी गटाच्या पुरुषांच्या लढतीत सामन्याची गती पुन्हा एकदा बदलली. दिल्लीचा कर्णधार सुजीत कालकलने एक जबरदस्त शेवटचा डाव खेळत जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेता तुमूर ओचिर तुल्गाला ८-६ ने पराभूत केले.

# ३००० धावांचा टप्पा गाठला; सूर्या फटकेबाजीचा बादशहा बनला

**मुंबई :** भारताचा कर्णधार सूर्यकुम ार यादव टी२० फॉर्मेटमध्ये सर्वात जलदगतीने ३००० धावा करणारा पहिला फलंदाज ठरला आहे. सूर्यकुमारने न्यूझीलंडविरोधातील सीरजच्या ५ व्या सामन्यात ६३ धावांची तुफानी खेळी खेळली. न्यूझीलंडविरोधात खेळणाऱ्या या डावात खेळताना विश्वविक्रमाला गवसणी घातली.



सूर्यकुमारने न्यूझीलंडविरोधात वादळी खेळी खेळली. त्याने गोलंदाज फॉकीला चौकार लगावून ३४ धावा केल्या. तसेच त्याने या धावांच्या मदतीने टी२० फॉर्म टमध्ये ३००० धावा पूर्ण केल्या. त्याने १८२२ चेंडूत टी२० फॉर्मेटममध्ये विश्वविक्रम केला. यूएईचा फलंदाज म ोहम्मद वसीमचा रेकॉर्ड मोडला. मोहम्मद वसीमने हा विक्रम १९४७ धावांमध्ये पूर्ण केला होता. ३५ वर्षीय सूर्यकुमार यादवने टी-२० इंटरनॅशनलमध्ये ३००० धावा करणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. रोहित शर्मा (४२३१), विराट कोहली (४१८८) यांच्या यादीत सामील झाला आहे. सूर्यकुमारचा हा फॉर्म आगामी टी-२० वर्ल्ड कपसाठी फायदेशीर ठरणार आहे. १०४ व्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळताना सूर्यकुमार यादवने ३६.९५ सरासरी आणि १६५.४८ च्या स्ट्राइक रेटने ३००० धावा कुटल्या. यात २४ अर्धशतक आणि ४ शतकाचा समावेश आहे.

# सामना श्रीलंकेत होणार होता, पण बहिष्कार का टाकला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी २० वर्ल्ड कपचा सामना हा श्रीलंकेत होणार होता. भारताम ध्ये हा सामना होणार नाही, हे यापूर्वीच जाहीर झाले होते. पण तरीही पाकस्तानच्या सरकारने भारताविरुद्धच्या सामन्यावर का बहिष्कार टाकला, याचे एकमेव कारण आता समोर आले आहे.बांगलादेशने वर्ल्ड कपला जो विरोध केला होता, त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, आम्हाला भारतात एकही सामना खेळायचा नाही. बांगलादेशला वर्ल्ड कपचे सामने भारताबाहेर हवे होते, हे सामने जर आयसीसीने भारताबाहेर ठेवले असते तर बांगलादेशचा संघ वर्ल्ड कप खेळला असता. पण पाकिस्तानचं डोकं कसं चालत, हे कोणीही सांगू शकत नाही. आयसीसीने पाकिस्तानचे सर्व सामने हे भारताबाहेर






ठेवले होते. पाकिस्तानचे वर्ल्ड कपचे सर्व सामने हे श्रीलंकेत होणार होते, पण तरीही पाकिस्तानने या वर्ल्ड कपमधील भारताच्या सामन्यावर का बहिष्कार टाकला, याचे कारण आता समोर आले आहे.बांगलादेशने प्रथम टी २० वर्ल्ड कपच्या सामन्यांना विरोध केला होता. आयसीसीने त्यांना नकार दिला. पाकिस्तानने या प्रकरणात एंट्री घेतली आणि त्यांनी आगीत तेल टाकण्याचे काम केले. बांगलादेशला त्यांनी आश्रस्थ केले आणि त्यामुळेच बांगलादेशने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पाकिस्तानही संपूर्ण वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकेल, असे सर्वांना वाटले होते. पण पाकिस्तानने वेगळाच गेम केला आणि त्यांनी फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार टाकला.

फक्त भारताविरुद्धच्याच सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे एकमेव कारण म्हणजे पाकिस्तानला आपले महत्व आयसीसी आणि बाकीच्या देशांना दाखवून द्यायचे आहे. कारण भारत आणि पाकिस्तान सामान हा जगातील कोणत्याही कोपऱ्यात असला तरी तो मोठ्या संख्येने पाहिला जातो. या सामन्यासाठी सर्वात जास्त प्रसारणाचे हक्क मिळतात, जाहीराती, तिकिटांचे भाव तर या सामन्यासाठी गगनाला भिडणारे असतात. त्यामुळे प्रत्येक मोठ्या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामने खेळवले जातात. कारण या सामन्यामधून सर्वात जास्त पैसा मिळत असतो, जो अब्जावधी रुपयांमध्ये असतो. जर आम्ही सामने खेळलोच नाही तर हा पैसा येणार तरी कुठून, हे पाकिस्तानला आयसीसीला दाखवून द्यायचे आहे. त्यामुळे जगाला आपली ताकद दाखवण्यासाठी पाकिस्तानने फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार टाकल्याचे आता समोर आले आहे. पाकिस्तानने फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार घालत नेमकं काय दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, हे आता समोर आलं आहे.

# शाळेतल्या स्पर्धांमधून शिकत जातो ना? रिॲलिटी शोवर होणाऱ्या टीकेवर बोलली वैशाली सामंत

**मुंबई :** वैशाली सामंत हे नाव समोर येताच 'ऐका दाजिबा' या गाण्यापासून सुरू झालेला एका अनुभवसंपन्न गायिकेचा प्रवास संगीतप्रेमींसमोर येऊ लागतो. 'ही गुलाबी हवा', 'कोंबडी पळाली', 'दूरच्या रानात', 'चांद मातला', 'वाटेवरी मोगरा' अशा अनेकानेक बहारदार गाण्यांमधून तिनं आपला चाहतावर्ग निर्माण केला. पार्श्वगायनासह संगीतकार आणि परीक्षक म्हणूनही तिचं काम सुरू आहे. स्टार प्रवाहवरील ' मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद ' या रिॲलिटी शोमध्ये परीक्षक म्हणून काम करण्याच्या अनुभवांसह तिनं विविध विषयांवर संवाद साधला. रिॲलिटी शोमध्ये नकळत्या वयात म ुलांवर स्पर्धा लादली जाते किंवा अनेकदा त्या कार्यक्रमाच्या स्वरूपावर टीका होते. या मुद्द्यावर वैशाली तिची स्पष्ट मतं म ांडते. ती म्हणाली, 'कुठल्याही गोष्टीचा श्रीगणेशा बालवयात होतो. मुलांची आवड समजून-उमजून पालक एखाद्या चांगल्या व्यासपीठावर मुलांना पाठवत असतील, तर त्यात गैर काहीच नाही. शालेय स्तरावरही कमी वयातच आपण स्पर्धांमध्ये सहभागी होतो ना?, त्यातून शिकत जातो ना?, मग स्पर्धा कुठे होतेय, कोण घेतंय, तिचं स्वरूप हे सगळं पाहून त्यात मुलांना पाठवायला हरकत नाही.'परीक्षक म्हणून मला बालमनांशी जोडलं जाणं फार महत्त्वाचं वाटतं. ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर, गायक आदर्श शिंदे आणि मी हाच विचार करून परीक्षकांच्या खुर्चीत बसतो. परीक्षणापेक्षा त्यांच्या वयाचं होऊन त्यांच्याशी संवाद साधतो. एखाद्या कार्यक्रमाची अनेक पर्व होत असतील, तर ही त्याच्या दर्जाची



पावती आहे. पालकांनी आपली स्वप्नं वा अपेक्षा मुलांवर लादणं गैर आहे; पण मुलांची आवड लक्षात घेऊन त्यांच्या व्यक्तित्त्वाला पैलू पाडण्यासाठी स्पर्धेत पाठवणं चुकीचं नाही, असं माझं मत आहे. आम्ही मुलांइतकंच लहान होऊन आमचं बालपण पुन्हा जगण्याचा प्रयत्न करतो. आदर्श आणि मी सचिन पिळगांवकर यांच्याकडून अनेक गोष्टी शिकलो. त्यांची अनुभवसमृद्धता थक्क करणारी आहे', असं वैशाली म्हणाली. संगीतमय सिनेमांचा अपवाद वगळता हल्ली सिनेमांतली गाणी कमी होत आहेत. बहुतांश सिनेमांत 'रिक्रिएट' गाणी जास्त दिसतात. त्याबद्दल वैशाली म्हणते, 'बदल ही गोष्ट शाश्वत आहे. संगीत या संकल्पनेत प्रयोग होत आहेत. माध्यमं बदलली आहेत. एका गाण्यावर टिकण्याचा, ऐकण्याचा काळ बदलला आहे, तसं चित्रपटसंगीतही बदलतंय. 'इंडिपेंडंट म्युझिक' पुन्हा ट्रेंडिंगमध्ये येतंय, जे आम्ही नव्वदच्या दशकानंतर सुरू केलं होतं. सिनेमात गाणी अनेकदा कथेनुरूप वापरली जात असल्यानं कमी कडवी असतात. ही सगळी बदलांची नांदी आहे. जुनी गाणी पुन्हा करण्याबद्दल बोलायचं, तर तेव्हाचं संगीत संयोजन, वाद्यमेळ, तंत्रज्ञान आणि आता झालेले बदल यात ते गाणं करायला मजा येते. आपलीच गाणी आपण विविध पद्धतीनं सादर करण्याचा प्रयत्न करण्यात एक वेगळं आव्हानही आहे.'गायिका-परीक्षक यासह वैशाली यंदा स्वतंत्रपणे संगीतकार म्हणून पदार्पण करतेय. त्याविषयी ती म्हणाली, 'लग्न अनब बरंच काही' असं नाव असलेल्या सिनेमाला मी संगीत देतेय. नव्या वर्षात ज्या काही अनेकविध गोष्टी करणार आहे, त्यातलं हे नवं पाऊल आहे. या सिनेमाचं वैशिष्ट्य म्हणजे, ऑल फिमेल क्रू यासाठी काम करत आहे. नव्या वर्षात सांगीतिक उद्योग करत राहणं, आपण केलेल्या कामाचा पुन्हा पाठपुरावा घेणं, त्यात प्रयोग करणं, असं ठरवलं आहे.

## 'मी फुटपाथवरही झोपलोय'

**मुंबई :** जावेद अख्तर हे फराह खानचे काका आहेत. जावेद अख्तर यांचं पूर्वी फराहची मावशी हनी इराणीशी लग्न झालं होतं. या लग्नापासून त्यांना झोया अख्तर आणि फरहान अख्तर ही दोन मुले आहेत. पण, हनी इराणी आणि जावेद अख्तर यांचा नंतर घटस्फोट झाला. हनीपासून वेगळे झाल्यानंतर त्यांनी अभिनेत्री शबाना आझमीशी लग्न केलं. जावेद अख्तर यांनी फराहच्या व्हिडिओमध्ये त्यांच्या खंडाळा येथील बंगल्याबद्दल सांगितलं असून त्यांच्या संघर्षाच्या दिवसांबद्दलही सांगितलं. व्हिडिओमध्ये शबाना यांनी खुलासा केला की, त्यांनी ही संपत्ती १५ वर्षांपूर्वी खरेदी केली होती. शबाना म्हणाल्या, 'मला जेव्हा या आलिशान बंगल्याबद्दल कळलं तेव्हा मला या बंगल्याला वीकेंड कॉटेजमध्ये बदलायचं होतं. आम्ही दररोज त्यावरून भांडायचो. मग त्याचा एक मित्र म्हणाला, 'जावेद अख्तर म्हणजे शोले आणि तू म्हणजे अंकुर. या दोघांचं कधीही एकमत होऊ शकत नाही. अंकुरला सोडून शोले बनव'संघर्षाबद्दल बोलताना जावेद अख्तर म्हणाले की, 'कधीकधी मला वाटतं की, हे माझ्यासोबत घडत आहे का? ज्यांच्या आयुष्यात काहीही नाही ते किती मस्त आयुष्य जगू शकतात. मी तीन दिवस जेवलो नसताना उपासमारीवर एक कविता लिहिली होती. तुम्ही मोठ्या घरात राहू शकता, पण तुमच्या आयुष्यात एक छोटी खोली आहे जी नेहमीच तुमच्यासोबत असते. मी त्यावेळी फूटपाथवरही झोपलो आहे.'दरम्यान, जावेद अख्तरच नाही तर शबाना आझमी यांचं सुरुवातीचे आयुष्यही अगदी साधं होतं.



## बिग बॉसच्या घरातील अस्वच्छतेमुळे सोनालीला आजार

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ चं दुसरं एलिमिनेशन काल पार पडलं. दुसऱ्या एलिमिनेशनमध्ये सोनाली राऊत एलिमिनेट झाली. अशातच आता बिग बॉसमधून बाहेर पडल्यानंतर नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सोनालीनं बिग बॉसच्या घरात तिला झालेल्या आजारपणाबद्दल सांगितलं आहे. सोनाली राऊतनं नुकतीच 'इट्स मज्जा'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान सोनालीनं तिला बिग बॉसच्या घरात झालेल्या त्रासाबद्दल सांगलितलं आहे. सोनाली म्हणाली की, 'पहिल्या आठवड्यात जेव्हा मी सगळ्यांना भेटले, तेव्हा अनुभव खूप चांगला होता. त्यातल्या काही जणांना माझ्याबद्दल माहित होतं. त्यांना वाटलेलं की, जर भांडण झालं तर, हिच्याचसोबत होणार. माझा पहिला आठवडा जर पाहिला, तर भांडण माझ्यावरूनच सुरू झालेलं, आणि ग्रुप्समध्येपण आधी ठरलेलं.'सोनाली पुढे म्हणाली की, 'पहिल्याच आठवड्यात तिसऱ्या की चौथ्या दिवशी मला इन्फेक्शन व्हायला लागलं. आपण जेव्हा आतमध्ये राहतो, हे खूप वेगळं आहे. तिथे गार्डनर



एरिया पण ओपन नव्हता. जेवढे स्पर्धक होते, ते आपल्याला माहित आहेत. ते वेगळ्या क्षेत्रातून येतात. ते खूप साधे आहेत, तुम्हाला पण माहितीये त्यांची पार्श्वभूमी काय आहे. आपण एकत्र सगळे राहतो, तर कुठे ना कुठे हायजिन, कॉम्प्रोमाईज्ड होते. त्यामुळे मला इन्फ ेक्शन झालं, त्याचा गेमवर पण परिणाम झाला. मी दुसऱ्या आठवड्यात सगळ्यांपासून लांब राहत होते. मी त्यांच्यामध्ये सहभागी झाली नाहीबिग बॉसच्या घरात काळजी कोणी घेतली? याबद्दल विचारलं असता सोनाली म्हणाली की, 'काळजी सर्वांनीच घेतली. मी स्वतःही स्वतःची काळजी घेत होती. मी तो टास्कसुद्धा केला नाही, शेणाचा. कारण, मला माहितीये, त्याचा परिणाम माझ्या तब्येतीवर होणार होता. मी सांगत होते, मला कपडे चेंज करून द्या, पण कोणाला काही कळतच नव्हतं की, मी कशातून जात होते. डॉक्टर्ससुद्धा आले, पण तेसुद्धा काही सांगू शकत नव्हते. मला औषधं दिलेली, पण त्याचा काहीच परिणाम होत नव्हता. मला घराच्या बाहेर जाऊनच उपचार घ्यावे लागणार होते. अजूनही माझी ट्रिटमेंट सुरू आहे.' असं सोनालीनं पुढे सांगितलं.



## मी कधीच काहीच रीव्हीलिंग केलेलं नाहीये' साडीतील बोल्ड लूकवर स्पष्टच बोलल्या ऐश्वर्या नारकर

**मुंबई :** ऐश्वर्या नारकर या मराठी कलाविश्वातील सुप्रसिद्ध अभिनेत्री असून त्यांनी आजवर अनेक नाटक, मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. ऐश्वर्या सोशल मीडियावर कायम सक्रीय असतात. ऐश्वर्या नारकर त्यांचे पती अविनाश नारकर यांच्यासोबत ट्रेंडिंग गाण्यावर रील्स बनवतात. ऐश्वर्या आणि अविनाश यांची उत्स्फ ूर्तता आजच्या तरुणाईलाही लाजवणारी आहे. ऐश्वर्या सोशल मीडियावर त्यांचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतात. त्यांचं साडीप्रेम, आणि साड्यांचं कलेक्शन चाहत्यांना दिसून येतं. अभिनेत्रीच्या काही फोटोवर त्यांचा बोल्ड लूक दिसत असल्याच्याही कमेंट्स येतात. अशातच आता ऐश्वर्या नारकर यांनी नुकत्याच एका मुलाखतीमध्ये यावर स्पष्टीकरण दिलेलं आहे.ऐश्वर्या नारकर यांनी नुकतीच अमोल परचुरे यांच्या 'कॅचअप'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान ऐश्वर्या नारकर म्हणाल्या की, 'बोल्ड लूकचं म्हणशील तर, मी असं कधीच काहीच रीव्हीलिंग असं कुठलंच काही केलेलं नाहीये. लोकांना साडीतली ती पोज बोल्ड वाटते की, अरे! काय बोल्ड आहे. खरं तर त्यात काहीच दिसत नसतं. कुठूनच काहीच दिसत नसतं. पण, आशय तुलालवार माझे फोटो काढतो आणि त्याच्यासोबत मी खूप ऊर्षोंरलश्रश असते. तो मला अगदी मित्र, भावासारखा आहे. त्याच्यामुळे त्याच्यासोबत मला शूट करताना कधीच अवघडल्यासारखं वाटत नाही. मला त्याच्यासमोर नेहमीच कंफर्टेबल वाटतं. तो एकदम करेक्टट क्लिक करतो.'तसंच त्या फोटोंमध्ये काहीतरी एक गंमत असते. पूर्ण छान व्यवस्थित पदर ठेऊन साडीत काढलेले ते फोटो आहेत. पण त्या नजरेते, एक्सप्रेशन मध्ये काहीतरी गंमत जाणवते. मला त्याच्याबरोबर ते फोटोशूट करताना नेहमीच गंमत येते.' असं ऐश्वर्या यांनी पुढे सांगितलं. दरम्यान, ऐश्वर्या नारकर यांच्या कामाबद्दल बोलायचं तर, त्यांनी 'या सुखांनो या', स्वामिनी', 'लेक माझी लाडकी' यांसारख्या मालिकांमध्ये काम केलं असून त्या 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या मालिकेत शेवटच्या दिसल्या होत्या.

# बुलढाणा जिल्हा कॉपीमुक्त करण्यासाठी प्रशासन सज्ज....

## १० वी आणि १२ वीच्या परीक्षांसाठी कडक निर्बंध

जनसंचलन/बुलढाणा

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षा जिल्ह्यात पारदर्शक, भयमुक्त आणि ङ्गकॉपीमुक्तफ वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील दक्षता समितीने या संदर्भात कडक मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, परीक्षा केंद्रांवर कडक देखरेख ठेवण्यात येणार आहे.यंदाच्या परीक्षेत जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी प्रविष्ट झाले असून त्याचे नियोजन खालीलप्रमाणे आहे: इयत्ता १२ वी: १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ (विद्यार्थी: ३५,२११ । केंद्र: ११७)

✻ इयत्ता १० वी: २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ (विद्यार्थी: ४०,८२८ । केंद्र: १६१) परीक्षा केंद्रांवर ङ्गकलम १४४फ लागू:परीक्षेच्या कालावधीत गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परिसरात कलम १४४ (जमावबंदी) लागू करण्यात आली आहे. तसेच, केंद्राच्या परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, कॉम्प्युटर सेंटर्स आणि मोबाईल सेंटर्स परीक्षा सुरू होण्यापूर्वी २ तास आधीपासून परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्रिस्तरीय सुरक्षा आणि देखरेख व्यवस्था: प्रशासनाने परीक्षेच्या गोपनीयतेसाठी आणि शिस्तीसाठी व्यापक यंत्रणा तैनात केली आहे: ०८ भरारी पथके: जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके कार्यरत राहतील. सी.सी. टी.व्ही. पाळत: जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर आणि १६ परिरक्षक केंद्रांवर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. बैठे पथक: प्रत्येक केंद्रावर महसूल विभागाचे ङ्गबैठे पथकफ तैनात असेल, जे पेपर सुरू होण्यापूर्वी १ तास धी केंद्रावर उपस्थित राहील. वाहतुकीसाठी कडक नियम:पेपरची गोपनीयता राखण्यासाठी परिरक्षक केंद्रावरून प्रश्नपत्रिका नेण्यासाठी आणि उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी केवळ चारचाकी वाहनांचाच वापर अनिवार्य करण्यात आला आहे. कोणत्याही शिक्षकाला किंवा रनरला मोटारसायकल वापरण्यास सक्त मनाई आहे.जिल्हा प्रशासनाचे आवाहन: कॉपीसारख्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. भावी पिढी सक्षम घडवण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याला तणावमुक्त वातावरणात परीक्षेसाठी प्रोत्साहित करावे. तसेच, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही परीक्षा प्रक्रिया पूर्णतः पारदर्शकपणे पार पाडावी,ङ्घ असे आवाहन जिल्हाधिकारी व दक्षता समितीने केले आहे.

# सिंदखेडराजा बाजार समिती सचिवांच्या मालमत्तेचा ६ फेब्रुवारीला जाहीर लिलाव...

## जमीन महसूल थकबाकी वसुलीसाठी महसूल विभागाची कठोर कारवाई

जनसंचलन/बुलढाणा

कृषी उत्पन्न बाजार समिती, सिंदखेडराजा येथील सचिवांकडे प्रलंबित असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी महसूल विभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. वारंवार सूचना देऊनही थकबाकीचा भरणा न केल्याने, संबंधित सचिवांची मालमत्ता जप्त (समपहरण) करण्यात आली असून, येत्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार, सिंदखेडराजा यांनी दिली आहे.मौजे सिंदखेडराजा,गट क्रमांक ५५/१अ, क्षेत्र २.०२ हेक्टर, आकार ३२३२/- रुपये. आणि मौजे किनगावराजा, गट क्रमांक ७८५, क्षेत्र ०.८१ हेक्टर, आकार ७.५०/- रुपये असे या मालमत्तेचे वर्णन आहे.या मालमत्तेचा जाहीर लिलाव दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २:०० वाजता तहसील कार्यालय, सिंदखेडराजा येथे आयोजित करण्यात आला आहे. तहसीलदारांनी निर्गमित केलेल्या नोटीसनुसार, लिलावाच्या दिवसापूर्वी थकबाकीची संपूर्ण रक्कम भरली न गेल्यास मालमत्ता सर्व भारांपासून मुक्त मानून जाहीर लिलावाद्वारे विकली जाईल. या प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी विहित वेळेत तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन महसूल प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

# समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री उभारणीसाठी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद

## ७ ते २३ फेब्रुवारी दरम्यान वाशिम बुलढाणा जिल्ह्यात ब्लॉक



जनसंचलन/मलकापुर

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यात आले आहे. हे काम वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील विविध टप्प्यांवर दि. ७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एकूण ३५ टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गावरील कि.मी. १७८+९०० ते २९०+४०० दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड), मंगरुळपीर, मालेगाव तसेच बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातून जाणाऱ्या मार्गावर ही गॅन्ट्री उभारली जाणार आहे. या कामासाठी संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून, काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक तत्काळ सुरू करण्यात येईल. महामार्गावरील मुंबई व नागपूर दिशेने जाणाऱ्या वाहतुकीवर ठराविक वेळेत परिणाम होणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा व प्रवासाचे नियोजन करूनच मार्गक्रमण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दि. ७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध तारखांना रात्री १२ ते १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत, मुंबई व नागपूर वाहिनीवर अनुक्रमे कि.मी. १७८.९००, १७९.७५०, १८३.७००, १८५.५००, १९०.४००, २००.४००, २०५.४००, २०८.२००, २०८.८५०, २३८.५५०, २४२.६००, २४५.४००, २५०.५००, २६०.४००, २६४.८००, २७०.४००, २८०.४००, २८१.४०० व २८३.९०० या ठिकाणी टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक पोलिस, महामार्ग प्रशासन व सूचना फलकांचे पालन करावे, असेही महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.



# रायपूर येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**जनसंचलन/ पिंपळगाव सराई**




तालुक्यातील रायपूर येथील तरुण शेतकरी विजय माणिकराव मुरडकर (३९) यांनी ३ फेब्रुवारी रोजी दुपारी स्वतःच्या शेतातील गोठ्यात आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. दुपारी सुमारे तीनच्या सुमारास हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर मृतकाचे बंधू परमेश्वर मुरडकर यांनी रायपूर पोलिस ठाण्यात घटनेची माहिती देत तक्रार दाखल केली. पोलिस ठाणेदार नीलेश सोळंकी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल आशिष काकडे व सुभाष घेवंदे यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बुलढाणा येथील जिल्हा रुग्णालयात पाठविला. मृतकाच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ, बहीण, पत्नी, मुलगा, मुलगी, असा परिवार आहे. मुरडकर हे अल्पभूधारक शेतकरी असून, नापिकी व बँकेच्या कर्जाचा ताण होता.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एका ४० वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना आसलगाव शिवारात रविवारी घडली. अपघातात या दुचाकीवर पाठीमागे बसलेला मित्र गंभीर जखमी झाला असून, पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुर्गा तायडे (४०, रा. निमगाव, ता.नांदुरा) हे आपल्या मित्रासह मोटारसायकलने जात असताना, १ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आसलगाव शिवारात हा अपघात घडला. विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपने चालवून तायडे यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकी चालक दुर्गा तायडे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत असलेला मित्र या अपघातात गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर अज्ञात वाहन चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी फिर्यादी जानराव लक्ष्मण आसलकर (४३, रा.निमगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलिस स्टेशनमध्ये अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





# केंब्रिज औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचा अजंता फार्मा छ. संभाजीनगर येथे औद्योगिक अभ्यास दौरा...

**जनसंचलन/बुलडाणा**




स्व. रामभाऊ लिंगाडे प्रतिष्ठान संचलित केंब्रिज औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक व औद्योगिक कौशल्य विकासाच्या दृष्टीने नामांकित अजंता फार्मा इंडस्ट्री छत्रपती संभाजीनगर येथे औद्योगिक अभ्यास दौऱ्याचे यशस्वी आयोजन केले. या अभ्यास दौऱ्यात बी फार्मसी व डी फार्मसी अभ्यासक्रमातील ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. इंडस्ट्री मध्ये विद्यार्थ्यांनी औषध निर्मितीच्या प्रत्येक टप्प्याची सखोल माहिती देण्यात आली कच्च्या मालाची निवड व तपासणी उत्पादन प्रक्रियेतील विविधटप्पे, गुणवत्ताहमी, पॅकेजिंग तसेच वितरण व्यवस्थापन यांची प्रत्यक्ष पाहणी विद्यार्थ्यांनी केली. यावेळी विद्यार्थ्यांना फार्मासिटिकल उद्योगातील आधुनिक यंत्रसामग्री ऑटोमॅटिक संशोधन व विकास विभागाची भूमिका तसेच नवीन औषधीची प्रक्रिया याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. उद्योगातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत फार्मा क्षेत्रातील बदलते ट्रेंड रोजगाराच्या संधी व शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांन विभाग प्रमुख प्रा. तोफिक शेख सर प्रा. अजय वाघ सर प्रा. गोपाल वाघ सर प्रा. नितीन चव्हाण सर व अनिता जाधव मॅडम यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध व उत्साही स्वभावामुळे अभ्यास दौरा यशस्वी ठरला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी महाविद्यालयीन प्रशासनाकडून अजंता फार्मा इंडस्ट्रीच्या व्यवस्थापनाचे व श्री. अमर बगडिया व श्री. पोपळ धनक यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभार मानले संस्थेचे अध्यक्ष विधानसभेचे पदवीधर आमदार माननीय श्री. धीरजभाऊ लिंगाडे यांनी नियोजित अभ्यास दौऱ्याचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या

# सृष्टीचे शिल्पकार भगवान विश्वकर्मा यांची जयंती बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात साजरी





**जनसंचलन/ बुलढाणा**

सृष्टीचे निर्माते आणि देवशिल्पी भगवान विश्वकर्मा यांची जयंती आज ३१ जानेवारी रोजी बुलढाणा शहरात विश्वकर्मा महाराज मंदिर एमआयडीसी जवळ येळगाव येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सर्व विश्वकर्मा सुतार समाज समिती तालुका बुलडाणाच्या वतीने साजरी करण्यात आली. सर्व प्रथम सकाळी ७ वाजता प्रभु विश्वकर्मा महाराज यांचे अभिषेक व पुजन करण्यात आले आहे.त्यानतंर सकाळी १० वाजता शोभायात्रा पालखी काढ्ण्यात आली आहे.त्यानंतर पुढे ज.न.म प्रवचनकार राजू महाराज सनान्से यांचे प्रवचण कार्यक्रम झाला आहे. त्यांनी आपल्या प्रवचन कार्यक्रम मधून चांगला बोध सर्वांना दिला आहे.सर्वांनी या आपल्या हक्कांच्या कार्यक्रम ला आले पाहिजे कुठल्याही मानाची अपेक्षा न बाळगता सर्वांनी आले पाहिजे त्यांनी आपल्या प्रवचनातून सांगितले कि. मान सन्मानाचा त्याग करून समाज हितासाठी राष्ट्रहितासाठी माणसाने एकत्र आले पाहिजे असे त्यांनी समाजाला मार्गदर्शन करतांना सांगितले आहे. पुढे बोलतांना त्यांनी अजून एक चांगले मार्गदर्शन चांगला संदेश असा दिला आहे कि,तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा हा अनमोल संदेश त्यांनी आपल्या प्रवचनातून दिला आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थिती मध्ये येळगाव ग्रामपंचयातचे सरंपच दादाराव लवकर,हिवराआश्रमचे दयानंदजी थोराहते,पुरूषोत्म अकोटकर सर आणि संतोष थोराहते उपस्थितीत होते.त्यानंतर महाआरती आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले आहे.बुलढाणा शहर तसेच तालुक्यातील असंख्य सुतार समाज बांधवांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला आहे या कार्यक्रमाला डॉ विजय खोलगाडे,समाधान सुरोशे सर, गजानन बोराडे,शांताराम सोनुने,शरद बोराडे, विजय बोराडे यासह असंख्य आदी सुतार समाज बांधव महिला मोठ्या संख्याने उपस्थितीत हाते.दिवसभर चाललेल्या या विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमुळे शहरात चैतन्याचे वातावरण होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८